उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी,वणी यांचे कार्यालय
दुरध्वनी क्रमांक-०७२३९-२२५३५६ ई-मेल-sdo.wani72@gmail.com

क्र.उविअ/भूसं/कली/कावि/७१७/२०१७ दिनांक. ६.०७.२०१७

** कलम - १९ **

(भूमिसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेंचा हक्क अधिनियम,२०१३)

भूसंपादन प्रकरण क्रं ०८/४७/२०१६-१७ मौजा. रांगणा ता. वणी जि. यवतमाळ

ज्याअर्थी,समूचित शासन असलेल्या यवतमाळ जिल्हयाच्या जिल्हाधिका-याने भूसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) (या पुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे.) यांचा कलम ११ च्या पोटकलम (१) व्दारेप्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन अधिसूचना क्र.उविअ/भूसं/कली/कावि/४५६/२०१६ दिनांक ११.०७.२०१६ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमीनीची अनुसूची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची गरज भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी यवतमाळ जिल्हाधिका-याने कलम - १५ च्या पोट कलम (२) अन्वये दिलेल्या अहवाल कोणताही असल्याचा विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे. याबाबत त्याची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीमध्ये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुर्नवसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषीत केली जात असुन पुनर्वसन योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचा कलम-३ च्या खंड (छ) अन्वये समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमा खालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्याकरिता उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी वणी यांना पदनिर्देशीत करिता आहे.

अनुसूची- एक

-संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन-

गावः- रांगणा तालुकाः- वणी जिल्हाः- यवतमाळ

अनुक्रमांक 1	भूमापन किंवा गट क्रमांक/ एकुण क्षेत्र		अंदाजित क्षेत्र (हेक्टर मध्ये)
1	2	3	4
1	30	2.67	0.08
2	32	3.93	0.09
3	201	3.51	0.06
4	202	1.21	0.02
5	203	4.70	0.15
6	206	1.44	0.05
7	207	1.62	0.05
8	21	2.12	0.01
9	24/1	1.18	0.01
10	24/2	1.42	0.03
11	25	0.87	0.02
12	26	0.87	0.02